दैनिक

# लोकनिष्ठ

LOK NISHT

संपादक - युनुस खान

dailyloknisht@gmail.com

● दैनिक ● छ.संभाजीनगर ● वर्ष-४ ● अंक - ६९ ● शुक्रवार दि. ७ ऑगस्ट २०२६ ● पाने - ८ ● किंमत २.०० रू.

RNI - MAHMAR/2023/87332

# शासनाने नाकारलेल्या माजीद पटेलला वक्फ प्रशासनाचा आशीर्वाद!

## निवृत्त अधिकाऱ्याच्या पुन्हा नियुक्तीवर प्रशासनाचा मौन...

**छत्रपती संभाजीनगर (दै. लोकनिष्ठ)** – महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळात होत असलेल्या भ्रष्ट्राचार व मनमानी कारभारा मुळे नव्या वादाला तोंड फुटले असून वक्फ मंडळाचे चेअरमन व सदस्य यांनी वक्फ मंडळामध्ये अधिकारी–कर्मचारी यांच्या नियुक्ती व पदोन्नती मध्ये झालेल्या अनियमितता असतांना नुकतेच मंडळाने मनमानी पद्धतीने सेवानिवृत्त अधिकाऱ्याला वक्फ प्रशासनावर लादल्याची माहिती समोर आली आहे.

सेवानिवृत्त अधिकारीवर कोणाचा एवढा प्रेम व आशीर्वाद आहे आणि कोणाच्या शिफारस व दबावावर नियुक्ती देण्यात आली आहे हे वेगळे सांगण्याची गरज नाहीत. निवृत्त झालेल्यांपैकी एकाखास अधिकारीची विशेष करून नियुक्तीची गरज होती का ? सध्या कार्यरत अधिकारी कर्मचारी सक्षम नाहीत का ? ज्याच्या विरुद्ध अनेक गंभीर तक्रारी असतांना त्याला कोणाच्या दबावाने किंवा कोणत्या यंत्र वापरुन नियुक्ती दिल्या ? एवढा गंभीर कायदेशीर पेच निर्माण झालेला असताना वक्फ प्रशासनाने याबाबत शासनाकडून किंवा सक्षम प्राधिकरणाकडून कायदेशीर मार्गदर्शन का घेतले नाही?

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळात सध्या कायद्याचे राज्य आहे की पदाधिकाऱ्यांची मनमानी असा संतात सवाल आता उपस्थित केला जात आहे. वक्फ मंडळात ज्यांचे काहीही अधिकार व पद कायम राहिले नाहीत ते वक्फच्या कारभारात हस्तक्षेप करत असल्याने व मीटिंग कॉन्फरेन्स आणि मुंबई कार्यालयात ठाण मांडून बसलेले असल्याचे चित्र दिसून येत असल्यावरून काही सदस्यांमध्ये नाराजगी असल्याची चर्चा सध्या जोरात सुरु आहे. वक्फ मंडळाच्या मनमानी कारभार व भ्रष्ट कार्यपद्धतीवर थेट बोट ठेवण्यात येत आहे. वक्फ मंडळातील निर्णय केवळ बैठकांचा कायदेशीरपणाच नव्हे, तर मंडळाच्या आर्थिक कारभारावरही गंभीर प्रश्न उपस्थित करण्यात येत आहेत. याविषय सरकार समोर अनेक तक्रार असल्यावरही कार्यवाही होत नसल्याने त्रस्त नागरिकांनी सरकारच्या भूमिकेवर संशय येत असल्याचे म्हटले आहे.आता या निवृत्त अधिकाऱ्याला शासनाचे आशीवाद कि प्रशासनाचा वरदान प्राप्त होते यावर राज्य सरकार काय भूमिका बजावेल याची सर्वांना प्रतीक्षा आहे.




सेवा निवृत्त अधिकारी माजीद पटेल यांची कंत्राटी पद्धतीने नियुक्ती केलेल्या या मनमानी कारभाराविरोधात नाराजगी पसरलेली आहे. जाणीवपूर्वक ठेवून,आपल्या पदाच्या अधिकाराचा गैरवापर करून हि नियुक्ती करण्यात आल्याचा आरोप केला जात आहे. कोणतीही चौकशी न करता पुनर्नियुक्ती केली गेली आहे.माजीद पटेल यांची नियुक्ती बेकायदेशीर व शासन आणि प्रशासनाच्या आदेश निर्देशांच्या विरुद्धची असल्याची सूत्रांनी म्हटले आहे.माजीद पटेल यांची कंत्राटी नियुक्ती चुकीच्या माहिती आधारे प्रशासनाला गोत्यात आणणार, सरकारी आणि निमसरकारी विभागांमध्ये शिस्तभंग किंवा गैरव्यवहार/घोटाळ्यांत दोषी सिद्ध झालेल्या कर्मचाऱ्यांना नियम डावलून भ्रष्ट मार्गाने पुन्हा नियुक्ती किंवा पदोन्नती देण्याचे प्रकार वेळोवेळी समोर आले आहेत. याप्रकरणात असे काही घडल्या असल्याचा संशय लोकांमध्ये निर्माण होत आहे. ठराविक अधिकारी माजीद पटेलची नियुक्ती शासनाच्या विरुद्ध मनमानीपद्धतीने करण्यात आल्याची चर्चा कार्यालयात सध्या जोराने सुरु आहे.हि नियुक्ती तातडीने रद्द करणे एकमात्र विकल्प वक्फ प्रशासना समोर राहिले आहे.

वक्फ प्रशासनात व त्याचबरोबर राज्यभरातून वक्फ कार्यालयात कामानिमित्त येणाऱ्यांमध्ये माजीद पटेल ची नियुक्तीची माहिती ऐकून नाराजीचे वातावरण निर्माण झाले असून वक्फ मंडळ आणि प्रशासनाने वास्तुरीस्थिती स्पष्ट करावी व ज्याला बोलण्याची पद्धत माहित नाही,अपमानास्पद वागणूक, लोकांना कार्यालयात शिव्या देणाऱ्या व मनमानीपद्धतीने वागणाऱ्याला तात्काळ कार्यमुक्त करून नियुक्ती रद्द करण्याची मागणी केले जात आहे. शासनाने तातडीने हस्तक्षेप करून ही बेकायदेशीर नियुक्ती रद्द केले नाही तर याविरोधात न्यायालयीन लढा उभारला जाईल असे स्पष्ट दिसून येते. आता शासन आणि वक्फ प्रशासन काय भूमिका मांडतील याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## हिमायतबाग सर्वे क्र.२२ मराठवाडा कृषी विद्यापीठाची शासकीय जमीन नामांतराचे खेळ!

# शासकीय जमिनींवर मालकी सांगणाऱ्यांना राज्य सरकारचा दणका पडणार

**छत्रपती संभाजीनगर (दै. लोकनिष्ठ)** – छत्रपती संभाजीनगर शहरातील हिमायतबाग सर्व्हे न. २२ ची मोक्याच्या ठिकाणी असलेल्या कोट्यवधी रुपयांच्या जमिन दीर्घकाळानंतर विविध अपील व नामांतरचे प्रकरण दाखल करून प्रकरण मंजूर करून घेण्याचे खेळ सध्या सुरु आहेत. मराठवाडा कृषी विद्यापीठ च्या नावावर महसुली अभिलेख नुसार नोंद असल्याचे दिसून येत असले तरी प्रकरणी या जागेचे खरे मालक बाबतचा वाद निर्माण झाला आहे.

मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी,फळ संशोधन केंद्र हिमायतनगर छत्रपती संभाजीनगर यांनी हिमायतबाग हिमायतनगर (जुने नाव मोहम्मदीया बाग) सर्व्हे न. २२ ची ७ एकर २ गुंठे जमीन कशाच्या आधारावर जमीन हस्तांतरित केल्या आणि मीर उस्मान अली खान (७वे निझाम) यांचे मालकीहक्क आणि यांच्या कडील मालकीहक्क व त्यांचे वारसदार याबाबत चे कायदेशीर बाब गुंतागुंतीचे असल्याची माहिती समोर आलेली आहे. ज्यामुळे सध्या सुरु असलेला वादांकित जमिनीचे दावे व प्रतिदावे,आरोप –प्रतिआरोप याबाबत स्पष्ट सध्या तरी लपविले जात असल्याचे सूत्रांनी दिलेल्या माहितीवरून समजते. सध्याचा हा खेळ कायदेशीररित्या अधिकाऱ्यांची दिशाभूल करून मलाई लाटण्याचा खेळ आहे.

हिमायतबाग सर्व्हे न. २२ जमिनीबाबत मालकी हक्काचा दावा केले जात आहे. सर्व्हे न. २२ हिमायतबाग च्या जमिनीवर नवाब मीर उस्मान अली खान निझाम सात वे हैदराबाद यांचा व मीर जुल्फेखार जाह आणि मुखत्यारआम साहेबजादा शरार रिझवानी पिता सय्यद हुसेन यांचे अधिकार व मालकीहक्काचे दावे याबाबतचे अपर तहसीलदार छत्रपती संभाजीनगर यांच्या कडे दोन वेगवेगळे प्रकरण आणि उप विभागीय अधिकारी छत्रपती संभाजीनगर यांच्याकडील प्रकरणाची सत्यता कागदपत्रांच्या आधारे लवकरच उघड होण्याची शक्यता आहे .

राज्यात महसूल विभागात वाढत्या भ्रष्ट्राचाराला कुठे तरी लगाम लावणे अत्यंत गरजेचे आहेत. राज्य सरकार भ्रष्ट्राचारावर अंकुश लावण्यास असफल असल्याचे सध्याचे चित्र आहे. मराठवाडा कृषी विद्यापीठ फळ संशोधन केंद्र हिमायतबागच्या सर्व्हे न.२२ शासकीय जमिनीवर दावा होत असल्याची माहिती समोर आलेली आहे. शासकीय जमिनीबाबत होत असलेले मालकीहक्काचे दावे, खरेदीखताच्या आधारे मालकीहक्क आधारे हक्क हे सर्वांचे पितळे लवकरच उघड होईल व या घोटाळ्यातील भूमाफिया व महसूल विभागाचे अधिकाऱ्यांचे संगमताचे खेळही उघड होईल अशी खात्रीलायक बातमी समोर येत आहे. याप्रकरणी कृषीमंत्री आणि महसूलमंत्री या घोटाळ्यात काय भूमिका घेतील याकडे पाहावे लागेल.

# मुंबई पोलिस दलात खळबळ : प्रत्यक्षात अस्तित्वात नसलेल्या पोलिस कर्मचाऱ्यांना कोट्यवधी रुपयांचे पगार

**मुंबई** – मुंबई पोलीस दलात एक धक्कादायक प्रकरण उघडकीस आले असून, त्यामुळे वेतन प्रणालीवर गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. प्रत्यक्षात अस्तित्वात नसलेल्या कर्मचाऱ्यांना कोट्यवधी रुपयांचे पगार दिले गेले. कागदोपत्री नोंद असलेल्या दहा कथित बनावट कर्मचाऱ्यांना २०१९–२० या वर्षात अंदाजे ६.४१ कोटी रुपये पगार म्हणून देण्यात आले. हा संपूर्ण घोटाळा जवळपास सहा वर्षांनंतर उघडकीस आला, जेव्हा कर्मचाऱ्यांची माहिती जुन्या 'सेवार्थ' या सॅलरी पोर्टलवरून नवीन सॉफ्टवेअर प्लॅटफॉर्मवर हस्तांतरित केली जात होती.

तपासादरम्यान असे उघड झाले की, ज्या व्यक्तींना पगार दिला जात होता, त्या मुंबई पोलिस कर्मचारी नव्हत्या. असे असूनही, त्यांची नावे वेतनपत्रकात समाविष्ट होती आणि दर महिन्याला त्यांच्या बँक खात्यात पगार जमा केला जात होता. मुंबई पोलिसांच्या उत्तर प्रादेशिक विभागातील एका अधिकाऱ्याच्या तक्रारीनंतर हे प्रकरण उघडकीस आले. तक्रारीनुसार, १० पोलीस नसलेल्या कर्मचाऱ्यांना विभागाचे कर्मचारी म्हणून दाखवून नियमितपणे पगार दिला जात होता. एफआयआरमध्ये नाव असलेल्या १० बनावट कर्मचाऱ्यांमध्ये रामदास भोगले, सुधाकर कदम, सरजू यादव, भगवत भोसले, गुणाजी खावकर, महादेव हलदणकर, राजेंद्र सोनार, उत्तम थोरात, सूर्यकांत पाटील आणि पांडुरंग कदम यांचा समावेश आहे. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, पगाराची फसवणूक प्रामुख्याने दोन टप्प्यांत झाली: पहिला टप्पा डिसेंबर २०१९ ते फेब्रुवारी २०२० आणि दुसरा टप्पा जून २०२० ते सप्टेंबर २०२०. या काळात, कथित बनावट कर्मचाऱ्यांच्या खात्यात नियमितपणे पगार जमा केला जात होता.



तपासात असा आरोप आहे की, मंत्रालयीन स्तरावरील काही लिपिकांनी संगनमत करून बनावट हजेरी नोंदवह्या आणि इतर नोंदी तयार केल्या. असाही आरोप आहे की, वेतनपटात बाहेरील व्यक्तींची नावे समाविष्ट करून त्यांना विभागाचे कर्मचारी म्हणून पगार देण्यात आला. त्यावेळी पदावर असलेल्या पाच जणांविरुद्ध एफआयआर दाखल करण्यात आला आहे. यामध्ये माजी प्रशासकीय अधिकारी रामकिशन गोस्वामी नागेश तळवाडेकर आणि विजया चव्हाण, तसेच मुख्य लिपिक अजय राठोड आणि वरिष्ठ लिपिक अमोल मेश्राम यांचा समावेश आहे. आरोपींवर भारतीय दंड संहिता, २०२३ अंतर्गत फसवणूक, बनावटगिरी, विश्वासघात आणि गुन्हेगारी कट रचल्याचा आरोप ठेवण्यात आला आहे.आरोपांनंतर मुंबई पोलीस विभागाने विजया च... आणि अमोल मेश्राम यांना निलंबित केले आहे. त्यांच्यावर अनधिकृत पगार मिळवण्यासाठी बनावट सर्व्हिस आयडी आणि डीसीपीएस आयडी तयार केल्याचा आरोप आहे. तपास यंत्रणांनुसार, त्यां १० कथित कर्मचाऱ्यांची नावे वेतनपटावर टाकू त्यांच्या पगाराला मंजुरी दिल्याचा आरोप आहे.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, हे प्रकरण २०२० सालचे आहे, आजचे नाही. या घोटाळ्यासाठी जबाबदार असलेल्यांवर कारवाई करण्यात आली असून ती सुरूच राहील, असे त्यांनी सांगितले. जिथे कुठे संशय आणि पुरावे असतील, तिथे सखोल चौकशी केली जाईल, असेही त्यांनी सांगितले. सध्या, या प्रकरणामुळे मुंबई पोलिसांच्या वेतन प्रणाली आणि देखरेख यंत्रणेवर अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. केवळ कागदोपत्री अस्तित्वात असलेले हे कथित कर्मचारी वेतन प्रणालीवर कसे आले आणि या संपूर्ण प्रकरणात कोणी कोणी भूमिका बजावली, याचा तपास यंत्रणा करत आहेत.

# आपल्याच पक्षाच्या चार मंत्र्यांच्या कामावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे नाराज ! मंत्रिमंडळात बदलाची चिन्हे?

**मुंबई** – महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आणि शिवसेना प्रमुख एकनाथ शिंदे यांनी आपल्या पक्षातील चार मंत्र्यांच्या काम गिरीवर नाराजी व्यक्त केली आहे. सूत्रांनुसार, काल झालेल्या मंत्रिमंडळपूर्व बैठकीत शिंदे यांनी संजय राठोड, गुलाबराव पाटील, संजय शिरसाट आणि आशिष जयस्वाल यांच्या काम गिरीवर तीव्र नाराजी व्यक्त केली. सूत्रांनुसार, शिंदे यांनी मंत्र्यांना स्पष्ट संदेश दिला की, केवळ मंत्रालयातील आपली खाती सांभाळणे पुरेसे नाही; त्यांनी आपापल्या मतदारसंघातील जनतेशी सक्रियपणे जोडलेले राहिले पाहिजे. त्यांनी पक्षाची संघटना मजबूत करण्याचे, कार्यकर्त्यांशी संवाद वाढवण्याचे आणि शिवसेनेची तळागाळातील उपस्थिती मजबूत करण्याचे निर्देशही दिले.



सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, बैठकीदरम्यान एकनाथ शिंदे यांनी मंत्र्यांना दुहेरी जबाबदारी स्वीकारण्याचे आवाहन केले: सरकारमधील आपापल्या विभागांच्या कामाचे प्रभावीपणे नेतृत्व करणे आणि त्याचबरोबर आपापल्या मतदारसंघातील सार्वजनिक प्रश्नांवर लक्ष देणे. मिळालेल्या माहितीनुसार, शिंदे यांनी मंत्र्यांना सार्वजनिक प्रश्नांना प्राधान्य देण्याचे आणि पक्षाचे कार्यकर्ते व सामान्य जनतेशी नियमित संपर्क ठेवण्याचे आवाहन केले. सूत्रांनुसार, काही मंत्री आपापल्या मतदारसंघांना आवश्यक वेळ देत नसल्याने आणि पक्ष संघटनेला पुरेसा वेळ देत नसल्याने शिंदे नाराज आहेत.

मंत्रिमंडळपूर्व बैठकीत महाराष्ट्राच्या विविध भागांमध्ये शिवसेनेच्या संघटनेच्या विस्तारावरही चर्चा झाली. विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र आणि पश्चिम महाराष्ट्रात पक्षाचा संघटनात्मक प्रभाव मजबूत करण्यावर विशेष भर देण्यात आला. आगामी राजकीय आव्हानांच्या पार्श्वभूमीवर, या भागांमध्ये पक्षाचा वावर वाढवण्याचे, स्थानिक अधिकारी व कार्यकर्त्यांशी उत्तम समन्वय साधण्याचे आणि तळागाळातील संघटना अधिक मजबूत करण्याचे निर्देश शिंदे यांनी दिले. सूत्रांनुसार, बैठकीदरम्यान एकनाथ शिंदे यांनी मंत्र्यांना असेही सूचित केले की, जर कामगिरी आणि संघटनात्मक सक्रियतेत सुधारणा झाली नाही, तर नजीकच्या काळात मंत्रिमंडळात फेरबदल करण्याचा विचार केला जाऊ शकतो. मंत्रिमंडळात फेरबदल अटळ आहे की नाही हे अस्पष्ट असले तरी, भविष्यातील राजकीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर शिंदे यांची नाराजी महत्त्वपूर्ण मानली जात आहे.

सूत्रांनुसार, संजय राठोड, गुलाबराव पाटील,संजय शिरसाट, आशिष जयस्वाल या चार मंत्र्यांना आपापल्या विभागांमध्ये, तसेच जनतेमध्ये आणि पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये आपला सक्रिय सहभाग वाढवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. शिंदे यांच्या नाराजीनंतर हे मंत्री आपल्या कामात आणि संघटनात्मक कार्यात किती बदल करतात, आणि भविष्यात महाराष्ट्र मंत्रिमंडळात काही मोठे फेरबदल पाहायला मिळतील का, हे पाहणे बाकी आहे.

### उल्हासनगर महानगर पालिकेचा 'दिव्याखाली अंधार'!

# शहराला नोटीस बजावणाऱ्या महापालिकेची मुख्य प्रशासकीय इमारतच धोकादायक

**उल्हासनगर** – पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरातील नागरिकांना सुरक्षित राहण्याचे आवाहन करत तब्बल ४२७ इमारतींना धोकादायक घोषित करणाऱ्या उल्हासनगर महानगरपालिकेचा भोंगळ कारभार समोर आला आहे. ज्या पालिकेवर संपूर्ण शहराच्या सुरक्षेची जबाबदारी आहे, त्या उल्हासनगर पालिकेची 'मुख्य प्रशासकीय इमारतच' अत्यंत धोकादायक असल्याचे उघडकीस आले आहे.



गेल्या दोन वर्षांपासून या मुख्यालयासाठी पर्यायी जागा शोधण्याचे काम सुरू आहे, मात्र पालिका प्रशासनाला अद्याप योग्य जागा मिळालेली नाही. परिणामी, दररोज या इमारतीत काम करणारे शेकडो कर्मचारी आणि आपल्या कामासाठी येणारे नागरिक आपला जीव मुठीत धरून येथे वावरत आहेत.

इमारतीला गेले मोठे तडे – दोन वर्षांपूर्वी जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत आमदार कुमार आयलानी यांनी उल्हासनगर पालिका मुख्यालयाची इमारत धोकादायक झाल्याचा मुद्दा उपस्थित केला होता आणि नवीन इमारतीसाठी निधीची मागणी केली होती. पालिकेने करून घेतलेल्या स्ट्रक्चरल ऑडिटमध्येही मुख्यालयाची ही इमारत धोकादायक असल्याचे स्पष्ट झाले आहे. इमारतीच्या खांबांना आणि स्लॅबला मोठे तडे गेले असून पावसाळ्यात प्लॅस्टर गळण्याच्या घटना घडत आहेत.

३५० कोटींचा डीपीआर; ५० कोटींचा निधी मंजूर – पालिकेकडून नवीन अद्ययावत प्रशासकीय इमारत उभारण्यासाठी हालचाली सुरु करण्यात आल्या आहेत. नवीन इमारतीसाठी पालिकेने ३५० कोटी रुपयांचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार केला आहे. या प्रकल्पासाठी राज्य सरकारने ५० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला असल्याची माहिती महापालिका अधिकाऱ्यांनी दिली आहे.

मात्र, नवीन इमारत उभी राहेपर्यंत पालिका प्रशासकीय कामकाज नक्की कुठे हलवायचे, यासाठी योग्य पर्यायी इमारत किंवा जागा गेल्या दोन वर्षांत पालिकेला शोधता आलेली नाही. त्यामुळे एखादी दुर्दैवी दुर्घटना घडल्यास याला जबाबदार कोण, असा संतप्त सवाल उल्हासनगरकर आणि पालिका कर्मचारी विचारत आहेत.

भ्रष्टाचारास वाचा फोडणारा एकमेव दैनिक
www.loknisht.in
लोकनिष्ठ
पुणे कार्यालय
संपर्क : अमजद खान
9860643044

# शून्यातून विश्व निर्माण करणारे डी. वाय. पाटील यांना अखेरचा निरोप


## उच्च शिक्षण आणि आरोग्यसेवेत परिवर्तन घडवून आणणाऱ्या एका कारकिर्दीचा अंत

**कोल्हापूर** – भारतातील सुप्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ आणि बिहार, त्रिपुरा व पश्चिम बंगालचे माजी राज्यपाल डॉ. ज्ञानदेव यशवंतराव पाटील यांचे मंगळवारी महाराष्ट्रातील कोल्हापूर येथील त्यांच्या निवासस्थानी निधन झाले. ते ९० वर्षांचे होते. जवळपास पाच दशकांच्या काळात, त्यांनी देशभरातील लाखो विद्यार्थ्यांना शिक्षण देणाऱ्या शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे आणि रुग्णालयांचे जाळे उभारून, ते महाराष्ट्रातील खाजगी शिक्षणाचे समानार्थी बनले.

अनेक विद्यार्थ्यांसाठी, खुद्द त्या व्यक्तीपेक्षा 'डी. वाय. पाटील' हे नावच अधिक परिचित झाले. त्यांच्या संस्थांमधून डॉक्टर, इंजिनिअर, व्यवस्थापन पदवीधर, दंतवैद्य, परिचारिका आणि संशोधक घडले, ज्यामुळे त्यांचा शैक्षणिक वारसा भारतातील सर्वात मोठ्या वारशांपैकी एक ठरला. २२ ऑक्टोबर १९३५ रोजी महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्ह्यात जन्मलेले ज्ञानदेव यशवंतराव पाटील एका शेतकरी कुटुंबातील होते. त्यांनी कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजमधून पदवीचे शिक्षण पूर्ण केले आणि त्यानंतर शिवाजी विद्यापीठात कायद्याचे शिक्षण घेतले, जिथे त्यांनी प्रथम श्रेणीत प्रावीण्य मिळवले. शिक्षण आणि लोकसेवेच्या सुरुवातीच्या अनुभवाने त्यांच्या आयुष्याची दिशा निश्चित केली.वकिलीचे प्रशिक्षण घेतलेले असले तरी, पाटील यांचे सर्वात मोठे योगदान न्यायालयाच्या आवारात नव्हे, तर वर्गांमध्ये मिळाले. डॉ. पाटील यांना महाराष्ट्रातील खाजगी उच्च शिक्षणाच्या प्रवर्तकांपैकी एक म ानले जाते. ज्या काळात व्यावसायिक शिक्षणाची उपलब्धता मर्यादित होती, त्या काळात त्यांनी अभियांत्रिकी, वैद्यकशास्त्र, दंतवैद्यकशास्त्र, नर्सिंग, फार्मसी, कृषी, व्यवस्थापन, वास्तुकला आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रम देणाऱ्या संस्थांची स्थापना केली. गेल्या काही वर्षांत, डी. वाय. पाटील ग्रुपने कोल्हापूर, नवी मुंबई, पुणे आणि इतर ठिकाणी विस्तार केला आणि अखेरीस शंभरहून अधिक शैक्षणिक संस्था व आरोग्य सुविधांपर्यंत पोहोचला. यापैकी अनेक संस्था पुढे वैद्यकीय आणि तांत्रिक शिक्षणासाठी मान्यताप्राप्त विद्यापीठांमध्ये विकसित झाल्या. त्यांची दूरदृष्टी केवळ शैक्षणिक क्षेत्रापुरती मर्यादित नव्हती. संस्थांशी संलग्न असलेली रुग्णालयेदेखील वैद्यकीय शिक्षण आणि रुग्णसेवेची प्रमुख केंद्रे बनली.

**जेव्हा शिक्षणाने त्याला राजभवनात नेले** – शिक्षण हे त्यांच्या आयुष्याचे कार्य राहिले असले तरी, पाटील यांनी महत्त्वाची घटनात्मक पदेही भूषवली. बिहारचे राज्यपाल होण्यापूर्वी त्यांनी त्रिपुराचे राज्यपाल म्हणून काम पाहिले. पुढे त्यांनी पश्चिम बंगालचे राज्यपाल म्हणून काम पाहिले, ज्यामुळे ते अनेक राज्यांमध्ये राजभवन भूषवणाऱ्या काही मोजक्या शिक्षणतज्ज्ञांपैकी एक बनले. आपल्या राज्यपालपदाच्या कार्यकाळात त्यांनी विद्यापीठे आणि उच्च शिक्षण संस्थांशी घनिष्ठ संबंध ठेवले. त्यांच्या नियुक्त्या शिक्षण क्षेत्रापलीकडील त्यांच्या प्रतिष्ठेचे द्योतक होत्या, जिथे त्यांना सार्वजनिक सेवा आणि संस्था उभारणीसाठी ओळखले जात होते.

**आजीवन कार्यासाठी पद्मश्री** – शिक्षण आणि



समाजसेवेतील योगदानाबद्दल डॉ. पाटील यांना भारताचा सर्वोच्च नागरी सन्मान असलेल्या पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. व्यावसायिक शिक्षणाची उपलब्धता वाढवण्यासाठी आणि देशभरातील विद्यार्थ्यांना आजही सेवा देणाऱ्या संस्थांची निर्मिती करण्यासाठी त्यांनी अनेक दशके केलेल्या कार्याची या पुरस्काराने दखल घेण्यात आली.त्यांचे कार्य समाजसेवा, आरोग्यसेवा आणि क्रीडा पायाभूत सुविधा या क्षेत्रांपर्यंतही विस्तारले होते, जी क्षेत्रे डी. वाय. पाटील परिसंस्थेचे अविभाज्य भाग बनली. विद्यार्थ्यांच्या अनेक पिढ्यांसाठी, 'डी. वाय. पाटील' हे नाव विद्यापीठाच्या प्रवेशद्वारांवर, पदवी प्रमाणपत्रांवर आणि रुग्णालयांच्या इमारतींवर दिसू लागले. त्या नावामागे एक अशी व्यक्ती होती, जिचा विश्वास होता की शिक्षण मोठ्या प्रमाणावर लोकांचे आयुष्य बदलू शकते. त्यांच्या निधनाने एका युगाचा अंत झाला आहे, परंतु त्यांनी स्थापन केलेल्या संस्था भारताच्या उच्च शिक्षण क्षेत्राला आकार देत आहेत, ज्यामुळे त्यांनी निर्माण केलेल्या विद्यापीठांमधून शिक्षण घेणाऱ्या, पदवी मिळवणाऱ्या आणि आपले करिअर घडवणाऱ्या लाखो विद्यार्थ्यांच्या माध्यमातून त्यांचा वारसा जिवंत राहील.

काँग्रेसचे विधान परिषद सदस्य म्हणाले की, वडिलांच्या जाण्याने त्यांच्या आयुष्याचा आधारस्तंभ असलेला वटवृक्ष कोसळला आहे. ''आमचा सर्वात मजबूत आधारस्तंभ पडला आहे. आयुष्यभर दादांनी लोकांशी नाते जोडले, लाखो विद्यार्थ्यांच्या जीवनात शिक्षणाचा दिवा लावला आणि समाजसेवेला आपल्या जीवनाचे ध्येय बनवले. त्यांनी आमच्यात एक चांगला माणूस म्हणून जगण्याची मूल्ये रुजवली. त्यांचा प्रेमळ, मायाळू हात, त्यांचे आश्वासक शब्द आणि मूल्यांनुसार जगण्याची त्यांची शिकवण हा आमचा सदैव अनमोल ठेवा राहील या भावना शब्दांत व्यक्त करणे अशक्य आहे,'' असे ते म्हणाले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, डॉ. डी. वाय. पाटील यांनी शिक्षण क्षेत्रात क्रांती घडवून आणण्यास मदत केली. ''शिक्षण क्षेत्रात क्रांती घडवून आणण्यात आणि समाजातील सामान्य व गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक संधी उपलब्ध करून देण्यात त्यांनी अमूल्य योगदान दिले. एका छोट्या शाळेपासून सुरू झालेला त्यांचा प्रवास खरोखरच आश्चर्यकारक आहे. त्यांच्या कार्याची व्याप्ती सुमारे २०० संस्था, विविध प्रकारची विद्यापीठे आणि हजारो विद्यार्थ्यांपर्यंत विस्तारली. विशेषतः वैद्यकीय, अभियांत्रिकी, फार्मसी आणि आर्किटेक्चर यांसारखे विविध अभ्यासक्रम आधुनिक सुविधांसह उपलब्ध करून देणाऱ्या महाविद्यालयांच्या स्थापनेद्वारे, त्यांनी केवळ त्यांच्या शैक्षणिक सम ूहालाच नव्हे, तर महाराष्ट्राची प्रतिष्ठाही उंचावली,'' असे मुख्यमंत्री म्हणाले. विरोधी पक्षनेते राहुल गांधी म्हणाले, ''माजी राज्यपाल, प्रख्यात शिक्षणतज्ज्ञ आणि समाजसेवक डॉ. डी. वाय. पाटील यांच्या निधनाची बातमी अत्यंत दुःखद आहे. शिक्षण आणि लोकसेवा क्षेत्रातील त्यांचे योगदान सदैव स्मरणात राहील. मी त्यांच्या शोकाकुल कुटुंबीय, हितचिंतक आणि समर्थकांप्रति माझ्या मनःपूर्वक संवेदना व्यक्त करतो.''

महाराष्ट्र काँग्रेसचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, डॉ. पाटील यांनी लाखो विद्यार्थ्यांना ज्ञान मिळवण्याची संधी दिली. ''एका शेतकरी कुटुंबातून शिक्षणतज्ज्ञ, महापौर, आमदार आणि राज्यपाल बनून डॉ. पाटील यांनी एक प्रेरणादायी प्रवास घडवला. त्यांनी आपल्या सार्वजनिक जीवनात लोकसेवेची परंपरा जपली, तर शिक्षण क्षेत्रात त्यांनी उभारलेल्या संस्थांच्या माध्यमातून लाखो विद्यार्थ्यांना ज्ञानाची संधी उपलब्ध करून दिली.'' सपकाळ म्हणाले की, सामाजिक परिवर्तनासाठी शिक्षण हे सर्वात प्रभावी साधन आहे, या विश्वासावर डॉ. पाटील आयुष्यभर कृतीतून जगले. डॉ. पाटील यांचे निकटचे सहकारी आणि मुंबई उच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश बी. जी. कोळसे-पाटील म्हणाले, ''आज मी माझा एक जवळचा मित्र गमावला आहे. ते सुरुवातीला राजकारणात होते आणि आमदार म्हणून त्यांनी काम केले. पण नंतर त्यांची आर्थिक परिस्थिती खालावली. त्यांच्या खिशात पैसे नव्हते. तरीही, त्यांनी शिक्षण क्षेत्रात उतरण्याचा धाडसी निर्णय घेतला.'' कोळसे-पाटील म्हणाले की, ८० च्या दशकाच्या सुरुवातीला तत्कालीन मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांनी डॉ. डी. वाय. पाटील यांना मदत करण्यास जराही वेळ घालवला नाही.

मुख्यमंत्री म्हणाले की, डी. वाय. पाटील आर्थिक अडचणीत असताना त्यांच्या वडिलांनी त्यांना मदत केली होती. त्यामुळे, त्यांनी बेलापूरमध्ये वैद्यकीय आणि अभियांत्रिकी महाविद्यालये स्थापन करण्याच्या प्रस्तावांना तात्काळ मंजुरी दिली. आणि तेव्हापासून डी. वाय. पाटील यांनी कधीही मागे वळून पाहिले नाही. ते एक मोठ्या मनाचे व्यक्ती होते, जे गरीब मुलांना मोफत शिक्षण देण्याच्या बाबतीत कधीही मागे हटले नाहीत. डी. वाय. पाटील ग्रुपच्या अंतर्गत त्यांचे कुटुंब कोल्हापूर, मुंबई, पुणे आणि पिंपरी-चिंचवड यांसारख्या शहरांमध्ये अनेक अभिमत विद्यापीठे, खाजगी विद्यापीठे आणि १८० हून अधिक शैक्षणिक संस्था चालवते. त्यांचे पुत्र डॉ. संजय डी. वाय. पाटील, सटेल पाटील, विजय डी. वाय. पाटील, डॉ. अजिंक्य डी. वाय. पाटील, आणि कन्या डॉ. नंदिता पालशेतकर, तसेच इतर सदस्य शिक्षण आणि आरोग्यसेवा क्षेत्रात सक्रिय आहेत.

शिक्षणतज्ज्ञांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. सिम्बायोसिस इंटरनॅशनल युनिव्हर्सिटीच्या कुलपती डॉ. विद्या येरवडेकर म्हणाल्या, ''गेल्या अनेक वर्षांपासून डॉ. पाटील यांना ओळखण्याचा आणि त्यांच्याशी संवाद साधण्याचा मला बहुमान मिळाला आहे. महाराष्ट्र आणि भारतातील उच्च शिक्षण क्षेत्रातील त्यांचे योगदान पिढ्यानपिढ्या स्मरणात राहील. त्यांचे निधन ही शिक्षण क्षेत्राची मोठी हानी आहे.'' एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक-अध्यक्ष विश्वनाथ कराड म्हणाले, ''गेल्या तीन-चार दशकांपासून डॉ. डी. वाय. पाटील यांच्याशी माझे अत्यंत जवळचे, कौटुंबिक नाते होते. मी त्यांना एक दूरदर्शी, दयाळू व्यक्ती आणि भावासारखा मित्र मानत होतो. ते आमच्या संस्थेसाठी एक आधारस्तंभ होते. डॉ. डी. वाय. पाटील यांनी त्यांच्या असंख्य शैक्षणिक संस्थांच्या माध्यमातून बहुजन समाजातील असंख्य विद्यार्थ्यांना दर्जेदार व्यावसायिक शिक्षण देऊन सक्षम केले. या योगदानाबद्दल महाराष्ट्र त्यांचे सदैव ऋणी राहील.''

भ्रष्टाचारास
वाचा फोडणारा
एकमेव दैनिक

औरंगाबाद
संपादक : युनुस खान
9890190231

www.loknisht.in
लोकनिष्ठ

पुणे कार्यालय
संपर्क : अमजद खान
9860643044

## संपादकीय

### 'गुंगी गुडिया' चा मौन कधी सुटणार?

राजकारणात कधी कोणता शब्द प्रचलित होईल सांगता येत नाही. आता 'गुंगी गुडिया' हा शब्द राजकारणात तसा नवा नाही. राम मनोहर लोहिया यांनी भारताच्या तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्यासाठी १९६० च्या दशकाच्या उत्तरार्धात हा शब्दप्रयोग केला होता. आता पुन्हा एकदा महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचा उल्लेख महाराष्ट्र काँग्रेसकडून 'गुंगी गुडिया' असा करण्यात आला. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनीही या टीकेचे समर्थन केले. सुनेत्रा पवार यांनी ही टीका सकारात्मकपणे घ्यावी आणि आपण 'गुंगी गुडिया' नसून दुर्गा असल्याचे सिद्ध करून अर्थ खाते स्वतःकडे घ्यावे, असा सल्ला सपकाळ यांनी दिला. यावरून राज्यातील राजकीय वातावरण तापले आहे. राज्यात ठिकठिकाणी राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी आंदोलने केली. याचदरम्यान टीकेवर खुद्द सुनेत्रा पवार यांनी सांगितले की, ''मी वेळ आल्यानंतर उत्तर देईन..'' सुनेत्रा पवार यांची अतिशय सूचक ही प्रतिक्रिया खरच महत्त्वाची आहे. अजितदादांचा वारसा पुढे चालवायचा असेल तर सुनेत्रा पवार यांना आता खंबीर बनावेच लागेल. अशा टिकांना उत्तर देत बसण्यापेक्षा त्यांनी कामाला महत्त्व दिले आणि वेळेवर आल्यावर उत्तर देण्याची भूमिकाही एका राजकारणात महत्त्वाची ठरणार आहे. काँग्रेसने सांगितले की, महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना आता हटवलेल्या सोशल मीडिया पोस्टमध्ये 'गुंगी गुडिया' म्हणण्यामागे त्यांचा अपमान करण्याचा हेतू नव्हता. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने (एनसीपी) काँग्रेसवर 'वैचारिक दिवाळखोरी' दाखवल्याचा आरोप केल्यानंतर विरोधी पक्षाने हे स्पष्टीकरण दिले आहे. सध्या या पोस्टचा वापर राजकीय फायद्यासाठी केला जात आहे. काँग्रेसचे प्रवक्ते अतुल लोंढे म्हणाले की, ही पोस्ट समाजवादी नेते राम मनोहर लोहिया यांनी माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्याबद्दल केलेल्या राजकीय टिप्पणीच्या संदर्भात होती आणि पवार यांच्यावर वैयक्तिक हल्ला करण्याचा हेतू नव्हता. पण मग 'गुंगी गुडिया'च्या मागे हेतू काय? होता हे सुध्दा महत्त्वाचे आहे. एका विशिष्ट राजकीय परिस्थितीच्या संदर्भात केल्या गेलेल्या या वैयक्तिक टिप्पणीने राष्ट्रवादी आक्रमक झाली आणि ती होणारच! दुर्दैवाने, काही लोक राजकीय फायद्यासाठी वातावरण भडकवण्याचा प्रयत्न करत आहेत. पण एखाद्या महिलेविषयही असे वक्तव्य करणे राजकारणाच्या संस्कृतीत बसते का? सुनेत्रा पवार यांच्या विरोधात केलेली टिप्पणी खेदजनक आहे. या टिप्पणीमुळे काँग्रेस आणि राष्ट्रवादीमध्येच नव्हे तर भाजप आणि काँग्रेसमध्येही जुंपली आहे. केवळ खेद व्यक्त करणे पुरेसे नाही आणि राजकीय नेत्यांनी सार्वजनिक वक्तव्ये करताना संयम बाळगला पाहिजे. नेत्यांनी काय बोलावे आणि काय बोलू नये हे समजून घेतले पाहिजे. अशा प्रकारची टिप्पणी करण्यापूर्वी भविष्यात पक्ष नेत्यांनी अधिक जबाबदारीने वागणे अपेक्षित आहे. सुनेत्रा पवार घटनात्मक पदावर आहेत. त्यामुळे त्यांच्याबद्दल असे वक्तव्य योग्य नाही. खेद व्यक्त करण्यापेक्षा टीका-टिपण्या सुधरवण्याची गरज आहे.

# सिद्धिविनायक मंदिरातील देणगी घोटाळ्यावरून राजकारण तापले!

**मुंबई** – मुंबईच्या प्रसिद्ध सिद्धिविनायक मंदिरातील कथित देणगी घोटाळ्याप्रकरणी महाराष्ट्र सरकारने कठोर भूमिका घेतली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गेल्या पाच वर्षांत मंदिरात मिळालेल्या देणग्यांचे, ज्यात रोख रक्कम आणि दागिने या दोन्हींचा समावेश आहे, सर्वसमावेशक लेखापरीक्षण करण्याचे आदेश दिले आहेत. मंदिर ट्रस्टने देणग्यांमध्ये मोठी तफावत असल्याची तक्रार केल्यानंतर हे महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. गेल्या दीड वर्षात देणग्यांमध्ये लक्षणीय वाढ झाली असून, त्या प्रति आठवडा ४०-५० लाख रुपयांवरून ८०-९० लाख रुपयांपर्यंत पोहोचल्या आहेत.



मुंबईच्या प्रसिद्ध सिद्धिविनायक मंदिरातील देणगी घोटाळ्यावरून महाराष्ट्रातील राजकारण तापले आहे. नुकतेच, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे (मनसे) प्रमुख राज ठाकरे यांनी मंदिरातून १८ कोटी रुपयांची देणगी चोरल्याचा दावा केला आहे. यामुळे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन सरकारने एक मोठा निर्णय घेतला आहे. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गेल्या पाच वर्षांत सिद्धिविनायक मंदिरात दानपेट्या आणि नैवेद्य म्हणून स्वीकारलेल्या सोन्या-चांदीच्या दागिन्यांचे ऑडिट करण्याचे आदेश दिले आहेत. यामुळे मंदिर प्रशासनात खळबळ उडाली आहे. या सरकारी कारवाईमुळे घोटाळ्यात सामील असलेल्या अधिकाऱ्यांवर आणि कर्मचाऱ्यांवर कारवाई होऊ शकते, असे मानले जात आहे.

वास्तविक पाहता, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे (मनसे) प्रमुख राज ठाकरे यांनी अलीकडेच सिद्धिविनायक मंदिरात घोटाळा झाल्याचा आरोप केला होता. त्यांनी म्हटले होते की, मंदिराच्या दानपेटीतून दरवर्षी अंदाजे १८ कोटी रुपयांचा अपहार आणि चोरी होत आहे. ठाकरे यांनी या प्रकरणी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र लिहिल्याचा दावाही केला होता. मनसे प्रमुखांनी सांगितले की, त्या पत्रानुसार मंदिराचे कर्मचारी या चोरीत सामील असल्याचा दावा करण्यात आला आहे. ते म्हणाले की, हे कर्मचारी पकडल्यानंतर सरासरी देणगीच्या रकमेत लक्षणीय वाढ झाली आहे. त्यांच्या पत्रानुसार, दरवर्षी अंदाजे १८ कोटी रुपयांचा अपहार होत होता. याची निष्पक्षपणे चौकशी झाली पाहिजे.

मंदिर ट्रस्टने हे आरोप फेटाळून लावले.दरम्यान, सिद्धिविनायक मंदिर ट्रस्टने राज ठाकरे यांचे आरोप तीव्रपणे फेटाळून लावले आहेत. ट्रस्टचे अध्यक्ष सदा सर्वंकर आणि विश्वस्त राहुल लोंढे यांच्या म्हणण्यानुसार, मे महिन्यात ट्रस्टने स्वतःच कायदा आणि न्याय विभागाला पत्र लिहून गेल्या पाच वर्षांतील देणग्यांच्या सविस्तर लेखापरीक्षणाची विनंती केली होती. ट्रस्टच्या म्हणण्यानुसार, अनियमितता लक्षात आल्यावर त्यांनी सर्वप्रथम लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे (एसीबी) प्रमुख विश्वास नांगरे पाटील यांच्याकडे तक्रार केली, त्यानंतर मंदिरात पोलीस कर्मचारी तैनात करण्यात आले. मार्च महिन्यात एक दानपेटी गायब झाल्याची तक्रार नोंदवण्यात आली. सीसीटीव्ही फुटेजमध्ये काही कर्मचारी एका लहान दानपेटीतून रोख रक्कम काढताना दिसले. सर्वंकर म्हणाले की, मंदिरात कोट्यवधी रुपयांचा अपहार मागील समितीच्या कार्यकाळात झाला होता, परंतु तो अशा प्रकारे मांडण्यात आला आहे की ज्यामुळे सध्याच्या समितीवरच बोट दाखवले जात आहे.

त्यांनी स्पष्ट केले की, काही कर्मचाऱ्यांकडून देणगी निधीच्या चोरीचे प्रकरण लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (एसीबी) मदतीने उघडकीस आले. यानंतर, ट्रस्टने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अखत्यारीत असलेल्या कायदा आणि न्यायपालिका विभागाला पत्र लिहून निष्पक्ष चौकशीची मागणी केली. त्यांनी पुढे सांगितले की, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनाही एक पत्र लिहिण्यात आले होते, जे कधीही पाठवले गेले नाही. हे पत्र राज ठाकरे यांच्या हाती लागले, ज्यांनी प्रसारमाध्यमांना अपूर्ण माहिती दिली. सरवणकर यांनी सांगितले की, तपासादरम्यान एसीबी अधिकाऱ्यांनी देणग्यांच्या मोजणीवर देखरेख केली आणि मुख्य आरोपी राजन पेंडुलकरसह नऊ जणांना अटक करण्यात आली. त्यांनी सांगितले की, या प्रकरणात आतापर्यंत नऊ जणांना अटक करण्यात आली असून ४६ कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे. त्यांनी पुढे सांगितले की, या प्रकरणात सीआयडी चौकशीचीही मागणी केली जाईल.

ट्रस्टच्या म्हणण्यानुसार, देणग्यांच्या चोरीव्यतिरिक्त, ऑनलाइन पेमेंटच्या बदल्यात व्हीआयपी दर्शन देणाऱ्या टोळ्या आणि नेटवर्क्सवर, तसेच फुल विक्रेते आणि टॅक्सी चालकांमार्फत होणाऱ्या अवैध दर्शनांवरही कारवाई करण्यात आली आहे. मंदिर प्रशासनाच्या मते, अशा सर्व कारवाया आता थांबवण्यात आल्या आहेत. सदासर्वंकर यांनी असा आरोप केला आहे की, अटक केलेल्या काही कर्मचाऱ्यांचे संबंध माजी विश्वस्त मंडळ आणि शिवसेनेशी (उद्धव बाळासाहेब ठाकरे) संबंधित व्यक्तींशी होते. तथापि, या आरोपांची स्वतंत्रपणे पुष्टी झालेली नाही.

दरम्यान, ट्रस्टने या घोटाळ्यात उद्धव ठाकरे यांच्या पक्षावर आरोप केल्यानंतर, आता ठाकरे पक्षाचे नेतेही उघडपणे समोर आले आहेत. मुंबईच्या माजी महापौर आणि बीएमसीच्या विरोधी पक्षनेत्या किशोरी पेडणेकर म्हणाल्या की, या निधीच्या अपहारामध्ये यूबीटीचा सहभाग असल्याचा आरोप करणाऱ्या सदा सर्वंकर यांनी आधी आत्मपरीक्षण केले पाहिजे. त्या म्हणाल्या की, ते पूर्वी पक्षात होते आणि पक्षाच्या तिकिटावर सातत्याने निवडणुका जिंकत आले आहेत. त्या म्हणाल्या की, ज्याप्रमाणे चंपत राय यांनी राम मंदिर घोटाळ्यात राजीनामा दिला, त्याचप्रमाणे त्यांनीही राजीनामा द्यावा. त्या म्हणाल्या की, यापूर्वी काय घडले किंवा काय नाही, हे तपास यंत्रणा निश्चित करतील.

**सिद्धिविनायक दानपेटी चोरीची चौकशी का होत नाही?**

महाराष्ट्र विधान परिषदेत, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राम मंदिरातील देणग्यांच्या चोरीसंदर्भात विरोधी पक्षांनी केलेल्या आरोपांना प्रत्युत्तर दिले. त्यांनी भूतकाळातील घटनांवरून विरोधी पक्षांवर हल्लाबोलही केला. शिंदे म्हणाले की, अयोध्येतील राम मंदिरात जे घडले त्याचे कोणीही समर्थन करू शकत नाही. या प्रकरणाची चौकशी सुरू आहे. यापूर्वी सिद्धिविनायक मंदिरातील दानपेटी चोरीला गेली होती. त्यावेळी या प्रकरणाची चौकशी का झाली नाही?

शिंदे म्हणाले, ''पंतप्रधान आणि उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री कोणालाही सोडणार नाहीत. जोपर्यंत त्यांना (आरोपींना) दगड फोडण्यासाठी तुरुंगात पाठवले जात नाही, तोपर्यंत ते स्वस्थ बसणार नाहीत. पण, मला तुम्हाला आठवण करून द्यायची आहे की, जे आज टीका करत आहेत त्यांच्या साथीदारांनी जेव्हा सिद्धिविनायक मंदिरातील दानपेटी लुटण्याचे पाप केले, तेव्हा चौकशीचे आदेश का देण्यात आले नाहीत?'' उपमुख्यमंत्री म्हणाले, ''मी जे बोलत आहे त्यासाठी पुरावे आहेत. मनसेच्या नेत्याने त्यावेळी एका पत्रकार परिषदेत हे उघडकीस आणले होते. हेच वास्तव आहे. मी खोटे बोलणार नाही. सिद्धिविनायक येथील दानपेटी लुटणेहे आमचे हिंदुत्व आहे का? सावरकरांना क्षमाशील म्हणणाऱ्यांच्या मांडीवर बसणेहे आमचे हिंदुत्व आहे का? बाळासाहेबांच्या विचारांचा विपर्यास करणेहे आमचे हिंदुत्व आहे का?''

# नियमानुसार काम जमत नसेल तर राजीनामे देऊन घरी जा! तुकाराम मुंढेंचा कर्मचाऱ्यांना इशारा

**मुंबई** – अन्न आणि औषध प्रशासनाचे आयुक्त तथा आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे यांनी त्यांच्या विरोधात तक्रार करणाऱ्या २९ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना थेट इशारा दिला आहे. ''ज्यांना शासनाच्या नियमांनुसार काम करायचे नसेल त्यांनी राजीनामा देऊन निघून जावे,'' असे स्पष्ट शब्दांत त्यांनी सुनावले. त्यामुळे एफडीए मधील कामकाजाच्या पद्धतीवरून सुरू झालेला वाद आणखी तीव्र होण्याची चिन्हे आहेत.

छत्रपती संभाजीनगर येथील राज्य अन्न आणि औषध प्रशासनाच्या प्रयोगशाळेतील २९ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी तुकाराम मुंढे यांच्या कार्यपद्धतीबाबत खात्याचे मंत्री नरहरी झिरवळ यांच्याकडे तक्रार केली आहे. १५ जुलै रोजी सादर करण्यात आलेल्या निवेदनात दोन शिफ्टमध्ये काम करण्याचा निर्णय, शनिवार-रविवार आणि सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी काम करण्याचे आदेश, रिक्त पदांमुळे वाढलेला कामाचा ताण तसेच त्यामुळे नमुन्यांच्या तपासणीच्या गुणवत्तेवर परिणाम होण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. या निवेदनावर संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या सह्याही आहेत.

या तक्रारीनंतर तुकाराम मुंढे यांनी आपली भूमिका स्पष्ट करत कर्मचाऱ्यांच्या आक्षेपांना उत्तर दिले. तुकाराम मुंढे म्हणाले, छत्रपती संभाजीनगरमधील कर्मचाऱ्यांनी माझ्या विरोधात मंत्री महोदयांकडे तक्रार केली की सुट्टी दिली जात नाही, अनेक तास काम करावे लागते. त्यांची पहिली मागणी आहे की, त्यांना इतर कार्यालयांप्रमाणे १०-६ ट्रिटमेंट द्यावी. मुळात लॅब हे



कार्यालय नाही. लॅबची सेवा ही २४ तास चालणारी संस्था असते. इतर शासकीय कार्यालयात वेळ फिक्स असते पण लॅबमध्ये तसं नसते. लॅब ही २४ तास चालू ठेवायची असते, ८ तास नाही. पण याचा अर्थ असा नाही की, कर्मचाऱ्यांनी २४ तास काम करावे. त्यांना ८ तासच काम आपण लावतो, फक्त ते शिफ्टमध्ये आहे.

प्रत्येकजण एकच शिफ्ट करणार, दिवसात दोन शिफ्ट नाही. आठवड्यात ४८ तासांच्या वर आपण त्यांना काम लावत नाही, च्या नियमांच्या वर कुणीही त्यांना काम देत नाही. एक दिवस सार्वजनिक सुट्टी आपण देतो. अजून आपण २४ तास ७ दिवस काम सुरू केलेले नाही. आता फक्त दोन शिफ्टमध्ये सहा दिवस काम सुरू केले आहे. गरज पडली तर २४ तासासुद्धा आपण लॅब सुरू करावी लागेल आणि पुढच्या काही दिवसांत ते सुरू होईलच. खासगी लॅब आणि सरकारी लॅब २४ तास चालतात. ज्या कर्मचाऱ्यांनी माझ्या विरोधात तक्रार केली त्यांची पहिली मागणी अत्यंत चुकीची आहे, त्यामुळे ती पूर्ण होऊ शकत नाही. १० ते ६ या वेळेत त्यांना ऑफिस देऊ शकत नाही. आठवड्यात त्यांना एक सुट्टी आम्ही देतोय. त्यामुळे त्यांचा जर काही गैरसमज झाला असेल तर तो पुढच्या काळात दूर करू. आता तिथे व्यवस्थित काम सुरू आहे. त्यांना सांगितले आहे की, या पद्धतीने काम होणे अपेक्षित आहे. ज्यांना शासन नियमांनुसार काम करायचे नाही ते राजीनामा देऊन निघून जाऊ शकतात, (दे आर फ्री टू रिजाईन अँण्ड गो), असे त्यांनी म्हटले आहे.

# 'काम बंद केलंत तर पगारही बंद करतो'; हायकोर्टा कडून डॉक्टरांची कानउघडणी

**मुंबई** – राज्यभरात सुरू असलेल्या डॉक्टरांच्या कामबंद आंदोलनाचे राज्याच्या आरोग्य व्यवस्थेवर काय परिणाम होतील? याचा विचार केला आहे का? असा सवाल करत हायकोर्टाने गुरूवारी या मुद्द्यावर सुमोटो याचिका घेत संपावर गेलेल्या डॉक्टरांची चांगलीच कानउघडणी केली. तसेच जर पालिका रूग्णालयात एक रूग्ण जरी उपचारांविना दगावला तर याद राखा. काम बंद केलंत ना मग पगार घेणेही थांबवा, या शब्दांत हायकोर्टाचा दट्या पडताच डॉक्टरांनी संप मागे घेत कामावर परतण्याची ग्वाही हायकोर्टात दिली.

डॉक्टरांच्या संपाचा दुसरा दिवस उजाडताच हायकोर्टानं यासंदर्भात हस्तक्षेप करत सुमोटो याचिका दाखल करून घेत 'इंडियन मेडिकल असोसिएशन' (महाराष्ट्र), मार्ड तसेच राज्य सरकारच्या वैद्यकीय शिक्षण विभागाला नोटीस देऊन दुपारी १ वाजता तातडीची सुनावणी घेण्याचे निश्चित केले. त्यानुसार मुंबई उच्च न्यायालयाचे प्रभारी मुख्य न्यायमूर्ती रवींद्र घुगे आणि न्यायमूर्ती गौतम अंखड यांच्या खंडपीठानं दुपारच्या सुनावणीत हायकोर्टाने आयएमएला थेट इशारा दिला की, जर वैद्यकीय संघटनेने संघर्षाचा मार्ग अवलंबला, तर कामबंद केलेल्या काळातील वेतन थांबवण्याचे आदेश आम्हालाही द्यावे लागतील. ''तुमच्याकडे आलेल्या रुग्णांच्या जीवावर तुम्ही संप करणार का? काम नाही तर मग पगारही मिळणार नाही हे ध्यानात ठेवा. महानगरपालिकेच्या किंवा सरकारी रुग्णालयात एकाही रुग्णाचा मृत्यू झाला तर याद राखा. संप मागे घेऊन तुम्ही रुग्णांवर तातडीने उपचार सुरू करा. आम्ही राज्य सरकारला होमिओपॅथ नोंदणीच्या बाबतीत युद्धपातळीवर कारवाई करण्यास सांगू,'' असे हायकोर्टाने संपकरी डॉक्टरांना ठणकावले.



डॉक्टरांच्या या आंदोलनामागील प्रमुख मुद्द्यांपैकी एक म्हणजे, महाराष्ट्र सरकारने लागू केलेला निर्णय, ज्यानुसार काही विशिष्ट होमिओपॅथी (बीएचएमएस) चिकित्सकांना एक ब्रिज कोर्स पूर्ण केल्यानंतर थेट महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेच्या (एमएमसी) स्वतंत्र रजिस्टरमध्ये नोंदणी करण्याची परवानगी देण्यात आलीय. हायकोर्टाचा हा रौद्र अवतार पाहून आयएमएचे प्रतिनिधित्व करणारे ज्येष्ठ वकील एस. यू. कामदार यांनी डॉक्टरांनी पुकारलेल्या संपामागची कारणे सांगताना स्पष्ट केले की, आम्ही या संपाचे समर्थन करत नाही. आयएमए पदाधिकाऱ्यांच्या सूचनेनुसार, हा संप तत्काळ मागे घेतला जाईल. यावर संघटनेच्या परिपक्वतेची प्रशंसा करत, हायकोर्टाने समाधान व्यक्त केले. तसेच आम्ही तुमच्या मागण्यांचा जलदगतीने विचार करण्याचे निर्देश राज्य सरकारला देतोय, होमिओपॅथ नोंदणीच्या मुद्द्यावर प्रमाणित कार्यप्रणाली तयार करण्यासाठी समिती स्थापन करण्याच्या अध्यादेशाची तत्काळ अंमलबजावणी करण्याचे निर्देशही यावेळी हायकोर्टाने राज्य सरकारला दिलेत.

त्यामुळे इंडियन मेडिकल असोसिएशनने (आयएमए) आपला संप 'तत्काळ' मागे घेत असल्याचे दुपारीच हायकोर्टापुढे मान्य केले. यावेळी सरकारी डॉक्टरांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या महाराष्ट्र असोसिएशन ऑफ रेसिडेंट डॉक्टर्सच्या (एमएआरडी) केंद्रीय युनिटचे अध्यक्ष डॉ. अथर्व शिंदे म्हणाले की, सध्या सुरु असलेल्या आंदोलनात त्यांनी आपत्कालीन सेवा कुठेही थांबवलेल्या नाहीत. डॉक्टरांच्या अशा भूमिकेचे कधीही समर्थन करता येणार नाही – 'आमच्या मागण्यांची कोंडी कायम राहिल्यास आम्ही आपत्कालीन सेवाही स्थगित करू' या डॉक्टरांच्या धमकीबद्दल यावेळी हायकोर्टाने तीव्र नाराजी व्यक्त केली. सेवाधर्म असलेल्या डॉक्टरांनी संप पुकारल्याने आम्हाला फार वाईट वाटतेय. याचे काय परिणाम होऊ शकतात? याचाही विचार करा. जर एखाद्या कारखान्यात महिनाभर संप झाला, तर सर्वात वाईट परिणाम म्हणजे एकूण उत्पन्नावर त्याचा परिणाम होतो. मात्र, डॉक्टरांच्या संपात जर रुग्ण दगावला, तर त्याला पुन्हा जिवंत करता येईल का? असा सवालही यावेळी हायकोर्टाने उपस्थित केला. याप्रकरणी हायकोर्टाने ज्येष्ठ वकील विनीत नाईक आणि वकील अमोघ सिंग यांची न्यायालयाचे मित्र (अमायकस क्युरी) म्हणून नियुक्ती केली आणि पुढील सुनावणी ८ सप्टेंबरपर्यंत तहकूब केलीय.

# बबनराव लोणीकरांना मुलाला आमदार करायचे अन् स्वत:ला खासदार व्हायचेय! अर्जुन खोतकर यांचेही मुलासाठी प्रयत्न

**जालना** – जालना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत संचालक असलेल्या मुलाला अध्यक्ष करण्यासाठी अडीच वर्षांपूर्वी भाजप आमदार बबनराव लोणीकर यांनी मोठा राडा घातला होता. माजी मंत्री राजेश टोपे यांच्यावर खालच्या भाषेत आणि वैयक्तिक टीका, समर्थकांकडून त्यांच्या गाडीची तोडफोड आणि नंतर एकमेकांच्या कार्यालयावर चालून जाण्याचा प्रयत्न यामुळे ही निवडणूक गाजली होती.



या राड्यामुळे त्यांना पुढील अडीच वर्षांसाठी ''तुमच्या मुलाला अध्यक्ष करू,'' हा शब्द मिळाला. ठरल्याप्रमाणे विद्यमान अध्यक्ष, उपाध्यक्षांनी आपल्या पदांचे राजीनामे दिले. नवे अध्यक्ष, उपाध्यक्ष बिनविरोध निवडले गेले. राजेश टोपे यांनी दिलेला शब्द पाळला आणि लोणीकर पुत्र राहुल हे बँकेचे अध्यक्ष झाले. यापुढे ''मी विधानसभेची निवडणूक लढवणार नाही, मी राहुलसाठी ही जागा सोडणार आहे,'' असे सांगणाऱ्या लोणीकर यांना आता खासदार व्हायचे आहे. २०२४ मध्येच त्यांनी परभणी लोकसभा मतदारसंघावर दावा केला होता. परंतु महायुतीत ही जागा रासपाच्या महादेव जानकर यांना सोडण्याचा निर्णय झाला आणि लोणीकर पुन्हा विधानसभा निवडणूक लढले व आमदार झाले.

जिल्हा बँकेच्या नवनिर्वाचित अध्यक्ष, उपाध्यक्षांचा सत्कार झाला. त्या कार्यक्रमातही लोणीकर यांनी, ''मला मुलाला आमदार करायचे आहे, मला खासदार व्हायचे आहे,'' अशी इच्छा जाहीरपणे बोलून दाखवली. यावर भाजपचे नेते तथा माजी मंत्री रावसाहेब दानवे यांनी लोणीकर आणि शिवसेनेचे आमदार अर्जुन खोतकर यांनाही चिमटा काढला.

''अर्जुन खोतकर यांनाही लोणीकरांच्या आजाराची लागण झाली आहे. पण ते अजून जाहीरपणे 'मी विधानसभा लढवणार नाही,' असे सांगत नाहीयेत. त्यांच्या मनाची घालमेल सुरू आहे,'' असा टोला त्यांनी लगावला. नुकत्याच झालेल्या परभणी-हिंगोली स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या निवडणुकीत मुलगा अभिमन्यू खोतकर याला उमेदवारी मिळावी, यासाठी खोतकर यांनी प्रयत्न सुरू केले होते.परंतु तेथे सईद खान या अल्पसंख्याक चेहऱ्याला संधी मिळाली. बबनराव लोणीकर यांच्याप्रमाणेच अर्जुन खोतकर हे देखील मुलगा अभिमन्यू याच्यासाठी जालना विधानसभा मतदारसंघ सोडण्याच्या विचारात असल्याची चर्चा या निमित्ताने जिल्ह्यात सुरू झाली आहे. असे झाले, तर मग अर्जुन खोतकर लोकसभा निवडणूक लढवणार का? आणि कोणत्या मतदारसंघातून? हा प्रश्न आता उपस्थित होत आहे.

# जात प्रमाणपत्र रद्द प्रकरणाचा वाद पेटणार?

## भाजपच्या बड्या नेत्याने जरांगे पाटलांची अक्कलच काढली!

**मुंबई –** मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी राज्य सरकारवर विशेषत: देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांच्या मंत्र्यांवर गंभीर आरोप केले आहेत. त्यांनी मराठ्यांचे जात प्रमाणपत्र रद्द करण्यात महसुल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा हात असल्याचे म्हटले आहे. तसेच एकनाथ शिंदे यांच्यावरील गद्दारीचा डाग आमच्या मुळे गेला, मात्र त्यांनी मराठ्यांशी डबल गेम खेळला असा जाहीर आरोप जरांगे पाटील यांनी केला आहे. जरांगे पाटील यांच्या आरोपांना एकीकडे फडणवीस, शिंदे, बावणकुळे आणि राधाकृष्ण विखे पाटील यांनी सबुरीने उत्तर दिले असताना भाजपाचे नेते प्रवीण दरेकर यांनी मात्र जरांगे यांना कठोर शब्दात उत्तर दिले आहे.

मनोज जरांगे पाटील यांनी केलेल्या गंभीर आरोपाबद्दल विचारले असता भाजपाचे नेते प्रवीण दरेकर यांनी आरोप करायला फार अक्कल लागत नाही. ज्यांना सिस्टीमच समजून घ्यायची नाही, त्यांच्याबद्दल काय बोलायचे? असा सवाल केला आहे. ते पुढे म्हणाले की जात पडताळणी समितीला न्यायालयीन अधिकार आहेत. कुठलाही मंत्री हस्तक्षेप करू शकत नाही, लेखी आदेश देण्याचा तर विषयच नाही. काही त्रुटी असतील म्हणून नोंदी रद्द केल्या असतील. झोपलेल्याला जागं करता येते, मात्र झोपेचे सोंग घेतलेल्याला जागं करता येत नाही अशा शब्दात दरेकर जरांगे यांच्यावर बरसले आहेत. जरांगे यांनी अल्टिमेटम दिला आहे त्याबद्दल विचारले असता दरेकर म्हणाले की, जरांगे सतत अल्टिमेटम देत असतात. महाराष्ट्र सर्व जाती धर्मांना बरोबर घेऊन जाणारे राज्य आहे. त्यांनी माणसे तोडण्यापेक्षा, जोडण्याचे काम करावे, मराठा आणि ओबीसी वाद लावणं महाराष्ट्राच्या हिताचे नाही असाही सल्ला दरेकर यांनी दिला आहे.

जरांगे यांनी आमदार पाडण्याचा इशारा दिला आहे या संदर्भात विचारले असता दरेकर यांनी जरांगे यांनी कुठल्यातरी मतदारसंघातून उभे रहावे. विधीमंडळात आल्यावर त्यांना सिस्टीम समजेल. रस्त्यावर आणि नाक्यावर बसून आंदोलन करणे आणि सिस्टीममध्ये राहून काम करणे, यात खूप फरक आहे. ते जर ५० आमदार पाडू शकत असतील, तर त्यांना माझ्या शुभेच्छा असेही दरेकर यांनी म्हटले आहे. काही मंत्र्यांकडून मराठा समाजाला त्रास दिला जातोय असा आरोप जरांगे यांनी केला आहे, त्याबद्दल विचारेल असता प्रवीण दरेकर




म्हणले की आरोप करायला फार अक्कल लागत नाही. कुठल्या मंत्र्याने त्रास दिला त्यांचे नाव जरांगे यांनी सांगावे. आम्ही मराठा समाजाचे, पण आम्हाला कोणता मंत्री त्रास देत नाही. मुख्यमंत्री आम्हाला ताकद देतात. बावनकुळे हे सर्व जाती धर्माला सोबत घेऊन जाणारे नेते आहेत. त्यांची प्रतिमा मलिन करणे योग्य नाही असेही प्रवीण दरेकर यांनी म्हटले.

**कुणबी प्रमाणपत्र रद्द का झालेत?** महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या आदेशानंतरच कुणबी प्रमाणपत्र रद्द करण्यात आल्याचा आरोप मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी केला. त्यांनी पत्रकार परिषदेतून सरकार आणि मंत्र्यांवर तोफ डागली. बावनकुळे यांनी त्यांचे आरोप फेटाळले. तर उद्योगमंत्री उदय सामंत यांनी त्यांच्याशी फोनवरून संवाद साधला. आता या सर्व वादावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रतिक्रिया आली आहे. कुणबी प्रमाणपत्र का रद्द झालेत यावर मुख्यमंत्र्यांनी स्पष्टीकरण दिले आहे. मनोज जरांगे पाटील यांच्या आरोपानंतर फडणवीस यांची प्रतिक्रिया आली आहे. ''ते नेमके काय बोलले ते ऐकले नाही. पण स्पष्ट सांगतो की, प्रमाणपत्र जेव्हा जात पडताळणी समितीकडे जाते, तेव्हा समिती सर्वोच्च न्यायालयाच्या अंतर्गत काम करत आहेत. राज्य सरकारचा हस्तक्षेप नाही. कोर्टाच्या आदेशाने करत आहेत. किती प्रमाणपत्र रद्द केले याची कल्पना नाही. पण मोठ्या प्रमाणात वेगवेगळे प्रमाणपत्र येतात त्यात १० ते १२ टक्के रद्द होतात. नॉन कुणबीही रद्द होतात. कागदपत्राची पूर्तता न झाल्याने रद्द होतात.'' असे उत्तर फडणवीस यांनी दिले.

जरांगे पाटील यांनी बावनकुळे यांच्या आदेशानंतर कुणबी प्रमाणपत्र रद्द झाल्याचा आरोप केला होता. त्यावर बोलताना, ''जाणीवपूर्वक कोणी करत नाही. पण कुणाचा यात काही आक्षेप असेल तर त्यात बघण्यात येईल. वरिष्ठ अधिकारी त्यात बघतील. योग्य प्रक्रिया झाली की नाही ते बघतील. यात अपील करता येईल. आम्ही सतेत आहोत, पण भाजपच्या अनेक नगरसेवक आणि जिल्हा परिषद समिती सदस्यांचे प्रमाणपत्र रद्द झाले आहेत. यात सरकारचा हस्तक्षेप नाही. कोर्टाच्या आदेशानेच ते काम करत आहेत. कुठलेही मंत्री असे करणार नाहीत. मी पुन्हा सांगतो, त्यात काही असेल अन्याय झाला वाटत असेल तर अपील करता येईल. ज्या त्रुटी समितीने काढल्या त्याची पूर्तता करता येतील.'' अशी प्रतिक्रिया फडणवीस यांनी दिली. मनोज जरांगे पाटील यांनी आंतरवाली सराटीत पत्रकार परिषद घेत सरकारविरोधात आरोपांची राळ उडवून दिली. त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह मंत्रिमंडळातील काही नेत्यांविरोधात जाहीर नाराजी व्यक्त केली. सरकारच्या धोरणांमुळेच कुणबी प्रमाणपत्र रद्द करण्यात येत असल्याचा आरोप त्यांनी केला. यावेळी त्यांनी राज्य सरकार डॉक्टरमध्ये भेद करत नसल्याचे वक्तव्य केले.

## पुणे रेल्वे स्थानकातून तब्बल ३ कोटींचे बेडशीट, टॉवेल चोरले, ट्रेनमध्ये प्रवाशांची हातसफाई

**पुणे –** रेल्वेच्या वातानुकूलित डब्यातून प्रवास करताना प्रवाशांच्या सोयीसाठी रेल्वे प्रशासन पांघरुण (बेडशीट),उशी (पिलो),टॉवेल उपलब्ध करून देते. मात्र काही प्रवासी आपला प्रवास संपण्यापूर्वी हा अंथरुण-पांघरुणाचा संच (बेडरोल) चोरी करत आहेत.पुण्यातून सुटणाऱ्या रेल्वेतून गेल्या पाच वर्षांत २ लाख ६ हजार ४८३ बेडरोल चोरीला गेले असून,याची किंमत जवळपास ३ कोटी रुपये इतकी आहे.यात बेडशीट चोरीला जाण्याचे प्रमाण सर्वाधिक आहे.

पुणे रेल्वे प्रशासनाच्या अधिकृत आकडेवारीनुसार,पुणे स्थानकातून दररोज जवळपास ३० रेल्वे गाड्यांना बेडरोल किटचा पुरवठा होतो.यात चादरी,टॉवेल,बेडशीट,उशी आणि फेस टॉवेल यांचा समावेश आहे.प्रवासा दरम्यान वापरण्यासाठी दिले जाणारे हे साहित्य प्रवासी आपल्या साहित्यसोबत घरी घेऊन जात असल्याचे यातून स्पष्ट झाले आहे. यात थेट रेल्वेचे आर्थिक नुकसान होत नाही.तर रेल्वे संबंधित ठेकेदाराकडून या रकमेची वसुली करते,तर ठेकेदार त्या डब्यातील कर्मचाऱ्यांकडून चोरीला गेलेल्या साहित्याच्या बदल्यात त्या रकमेची वसुली करतो. प्रवाशांच्या या चोरीच्या प्रवृत्तीचा फटका सामान्य कर्मचाऱ्यांना बसतो.

रेल्वे नियमानुसार,एसी डब्यात प्रवाशांना बेडरोल पुरवणे आणि प्रवाशाचे निश्चित स्थानक येण्यापूर्वी अर्धा तास आधी ते साहित्य पुन्हा जमा करून घेणे ही सर्वस्वी जबाबदारी ठेकेदार आणि त्याच्या कर्मचाऱ्यांची असते.अनेकदा रात्री-अपरात्री येणाऱ्या स्थानकांवर घाईगडबडीत प्रवासी उतरतात,तेव्हा काही प्रवासी टॉवेल किंवा बेडशीटसोबत घेऊन जातात. गाडी जेव्हा अंतिम स्थानकावर पोहोचते,तेव्हा जमा झालेल्या साहित्याची मोजणी होते.या मोजणीत जेवढ्या वस्तू कमी भरतात,त्याचे एकूण बाजारमूल्य निश्चित करून ती रक्कम थेट ठेकेदाराच्या बिलातून किंवा अनामत रकमेतून कापली जाते.प्रवाशांना बेडरोल पुरवण्याची आणि ते सुरक्षित जमा करण्याची संपूर्ण जबाबदारी खासगी ठेकेदाराची असते.

**पाच वर्षांत इतक्या वस्तूंची झाली चोरी –** चादरी- ६३५४९ ,उशीचे कव्हर - ५९०६३,फेस टॉवेल- ५७२०२ ब्लँकेट - १५०४३ ,उशी - ११६२६.पुणे विभागात गेल्या पाच वर्षांत जे साहित्य गहाळ झाले.त्याचे ऑडिट करून तब्बल २.८१ कोटी रुपयांची भरपाई ठेकेदाराच्या बिलातून वसूल केली आहे.सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान टाळण्यासाठी प्रवाशांनीही सहकार्य करणे अपेक्षित आहे,अशी माहिती रेल्वे जनसंपर्क विभागाकडून देण्यात आलेली आहे.

प्रवाशांना स्वच्छ बेडरोल पुरवण्याचे काम खासगी ठेकेदारांमार्फत केले जाते. नियमानुसार, प्रवाशांना दिलेले साहित्य गहाळ झाल्यास किंवा चोरीला गेल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी ठेकेदारावर निश्चित केली आहे.पुणे रेल्वे विभागात गेल्या पाच वर्षांत गहाळ झालेल्या या सर्व साहित्याची एकूण किंमत तब्बल २ कोटी ८१ लाख ७६ हजार ८९ रुपये इतकी निश्चित करण्यात आली.रेल्वेने आपले नुकसान टाळत ही संपूर्ण रक्कम संबंधित ठेकेदाराकडून वसूल केली आहे.

## पुण्यात अल्पवयीन आरोपीची धिंड काढणे पडले महाग! वरिष्ठ पोलीस निरीक्षकांची उचलबांगडी

पुणे – पुण्यातील भारती विद्यापीठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका अल्पवयीन गुन्हेगाराची सार्वजनिक धिंड काढल्याचे प्रकरण वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याच्या अंगाशी आलं आहे. या वादग्रस्त घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाल्यानंतर राज्य मानवाधिकार आयोगाने त्याची गंभीर दखल घेतली. या पार्श्वभूमीवर, प्रशासकीय पातळीवर मोठी हालचाल करत भारती विद्यापीठ पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मानसिंग पाटील यांची तातडीने विशेष शाखेत बदली करण्यात आली आहे. ही बदली केवळ नियमित प्रशासकीय प्रक्रिया नसून, थेट कारवाईच्या स्वरूपात असल्याची चर्चा पोलीस वर्तुळात सुरू आहे.

काही दिवसांपूर्वी भारती विद्यापीठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका गंभीर गुन्ह्यातील अल्पवयीन आरोपीला पोलिसांनी सार्वजनिक रस्त्यावरून चालवत नेले होते. यावेळी त्याची एकप्रकारे धिंड काढण्यात आली. याचे व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाले. कायद्यानुसार अल्पवयीन आरोपींची ओळख आणि मानवाधिकार जपण्याचे कडक नियम आहे. असे असताना पोलिसांनी केलेल्या या कृत्याबद्दल सुजाण नागरिकांनी आणि मानवाधिकार कार्यकर्त्यांनी तीव्र आक्षेप नोंदवला होता. हे प्रकरण उजेडात येताच राज्य मानवाधिकार आयोगाने थेट हस्तक्षेप केला. आयोगाने पुण्याचे पोलीस आयुक्त, संबंधित पोलीस उपायुक्त आणि वरिष्ठ पोलीस निरीक्षक मानसिंग पाटील यांना कारणे दाखवा नोटीस बजावून या संपूर्ण प्रकरणाचा सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. एवढेच नाही, तर मानवाधिकार आयोगाच्या एका विशेष पथकाने थेट भारती विद्यापीठ पोलीस ठाण्याला भेट देऊन प्रत्यक्ष जागेवर सखोल चौकशी केली. या चौकशीनंतर पोलीस प्रशासनात प्रचंड खळबळ उडाली. अखेर वरिष्ठ पोलीस निरीक्षक मानसिंग पाटील यांची तडकाफडकी तिथून उचलबांगडी करण्यात आली. या संवेदनशील प्रकरणात आता मानवाधिकार आयोग अंतिम अहवालानंतर संबंधित दोषी कर्मचाऱ्यांवर आणखी काय कडक कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश देणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# शिवसेना कोणाची : 'निवडणूक आयोगाकडून अधिकारांचा गैरवापर?' शिवसेना चिन्ह सुनावणीत सिब्बल यांचा प्रश्न

**मुंबई** – शिवसेना पक्षाचे नाव आणि धनुष्यबाण चिन्ह प्रकरणावर सुनावणीला सुरुवात झाली असून ठाकरे गटाकडून ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल युक्तिवाद करत आहेत. निवडणूक आयोगाने शिंदे गटाला शिवसेना पक्षाचे नाव आणि चिन्ह दिल्याच्या निर्णयावर सिब्बल यांनी प्रश्न उपस्थित केले आहेत. निवडणूक आयोगाने आपल्या कार्यक्षेत्राबाहेरील निर्णय घेतल्याचा दावा त्यांनी केला. १७ फेब्रुवारी रोजी निवडणूक आयोगाने शिंदे गटाला पक्षाचे चिन्ह दिले होते, त्यानंतर २३ फेब्रुवारी रोजी अपात्रतेची याचिका दाखल करण्यात आली होती, असा घटनाक्रम सिब्बल यांनी न्यायालयासमोर मांडला. पक्षातील फूट आणि अपात्रतेची कारवाई या दोन वेगळ्या बाबी असल्याचे न्यायालयानेही स्पष्ट केले आहे.

कपिल सिब्बल यांनी आपल्या युक्तिवादादरम्यान समाजवादी पार्टीमध्ये झालेल्या फुटीचा दाखला दिला. पक्षातील अंतर्गत वाद आणि विधिमंडळातील बदल यांचा राजकीय पक्षाच्या अस्तित्वावर थेट परिणाम होतो का, यावर त्यांनी प्रश्न उपस्थित केला. तसेच केरळ हायकोर्टाच्या एका निर्णयाचाही संदर्भ देत, निवडणूक आयोगाने आपल्या अधिकार क्षेत्रात नसलेले निर्णय घेतल्याचा दावा केला. यावेळी न्यायालयाकडून शरद यादव प्रकरणाचाही दाखला देण्यात आला. सुनील प्रभू यांच्या नियुक्तीचा मुद्दा हा वेगळा असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. विधानसभा अध्यक्षांच्या निर्णयाविरोधात याचिका दाखल करण्यात आली असून, आमच्या विरोधात निर्णय दिल्यानंतरच आम्ही न्यायालयात आलो असल्याचे सिब्बल यांनी सांगितले.

कपिल सिब्बल यांनी न्यायालयात शिवसेनेच्या घटनाक्रम ाची माहिती दिली. निवडणूक आयोगाने केवळ विधिमंडळातील संख्याबळाच्या आधारे पक्षाचे नाव आणि चिन्ह दिल्याचा दावा त्यांनी केला. शिवसेनेच्या राष्ट्रीय कार्यकारिणीची बैठक झाली होती आणि पक्षाच्या घटनेनुसार निर्णय घेण्याचा अधिकार संघटनेला असल्याचे त्यांनी सांगितले. बाळासाहेब ठाकरे यांनी निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार पक्षाची घटना बदलली होती, असा मुद्दाही सिब्बल यांनी मांडला. संघटना स्तरावर उद्धव ठाकरे यांच्याकडे बहुमत होते, तर विधिमंडळ स्तरावर एकनाथ शिंदे गटाकडे बहुमत होते. मात्र, शिंदे गट पक्षाच्या घटनेत बदल करू शकत नाही, असा युक्तिवाद सिब्बल यांनी केला.

**विधिमंडळातील फूट म्हणजे पक्षाची फूट का? – कपिल सिब्बल**

सुनावणीदरम्यान कपिल सिब्बल यांनी निवडणूक आयोगाच्या निर्णयाच्या आधारावर गंभीर प्रश्न उपस्थित केले. विधिमंडळ पक्षात पडलेली फूट ही संपूर्ण राजकीय पक्षाची फूट मानायची का, असा सवाल त्यांनी केला. पक्षाचे अस्तित्व केवळ आमदारांच्या संख्येवर ठरवता येणार नाही, तर पक्षाची संघटनात्मक रचना, घटना आणि कार्यकारिणी यांचाही विचार करावा लागेल, असे त्यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. या प्रकरणात पक्षचिन्ह, अपात्रता आणि पक्षावरील नियंत्रण या सर्व मुद्द्यांवर न्यायालयीन चर्चा सुरू असून, पुढील सुनावणीत युक्तिवादाला आणखी वेग येण्याची शक्यता आहे.



**खरी शिवसेना कोणाची?**

चार वर्षांपूर्वी शिवसेनेत उभी फूट पडली. शिवसेनेचे आज दोन गट आहेत. निवडणूक आयोगाने दिलेल्या निकालानुसार अधिकृत शिवसेना पक्ष आणि चिन्ह एकनाथ शिंदे यांच्याकडे आहे. दुसऱ्याबाजूला उद्धव ठाकरे गटाने या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. सुप्रीम कोर्टात या प्रकरणी आता नियमित सुनावणी सुरु आहे. काल शिवसेना ठाकरे गटाच्यावतीने ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी जोरदार युक्तिवाद केला. दोन्ही पक्षांनी अधिकृत शिवसेना पक्ष आपलाच असल्याचा दावा केला होता. निवडणूक आयोगाने फक्त विधिमंडळ पक्ष संख्येच्या आधारावर निर्णय दिला. यावर कपिल सिब्बल यांनी कोर्टात बाजू मांडताना म्हटले की, ''विधीमंडळ पक्ष हा राजकीय पक्षाचा भाग आहे. तो म्हणजे मूळ राजकीय पक्ष नाही, पक्षाची घटना योग्य आहे की नाही हे ठरवण्याचा अधिकार निवडणूक आयोगचा नाही''. सिब्बल यांच्या युक्तिवादानंतर सरन्यायाधीशांनी त्यांना काही प्रश्न विचारले. ''११-अ हे कलम जानेवारी २०१३ मध्ये निवडणूक आयोगाला कळविण्यात आले होते का? तसेच या कागदपत्रावरील स्वाक्षरीची आपण पुष्टी करू शकता का?'' असा सवाल न्यायालयाने विचारला.

एकनाथ शिंदेंच्या अडचणी वाढणार?

मोठी बातमी समोर येत आहे. आज पुन्हा एकदा शिवसेना पक्षाचं चिन्ह आणि नाव यावर सुप्रीम कोर्टात सुनावणीला सुरुवात झाली आहे. ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल हे शिवसेना ठाकरे गटाच्या वतीने न्यायालयात युक्तिवाद करत आहेत. यावेळी बोलताना कपिल सिब्बल यांच्याकडून निवडणूक आयोगाला देखील काही सवाल करण्यात आले आहेत. १७ फेब्रुवारी २०२३ रोजी निवडणूक आयोगाने एकनाथ शिंदे गटाला पक्षाचे नाव आणि चिन्ह दिले. त्यामुळे आता विधिमंडळ पक्षातील गटच मूळ पक्ष ठरतो, असा निष्कर्ष निघतो. परंतु विधिमंडळ पक्षातील फूट म्हणजे पक्षातील फूट मानायची का? असा सवाल यावेळी कपिल सिब्बल यांच्याकडून निवडणूक आयोगाला करण्यात आला आहे, त्यासाठी कपिल सिब्बल यांच्याकडून सपामध्ये पडलेल्या फुटीचा देखील दाखला देण्यात आला आहे.

पुढे बोलताना ते म्हणाले की, १९९९ चे संविधान हे मूळ संविधान नव्हते, त्यातही नंतर दुरुस्त्या झाल्या होत्या. ऑगस्ट ते ऑक्टोबर २०२२ या कालावधीत निवडणूक आयोगासमोरील कार्यवाहीदरम्यान दोन्ही पक्षांनी पक्षाच्या संघटनात्मक शाखेत त्यांना असलेल्या पाठिंब्याबाबत प्रतिज्ञापत्रे दाखल केली होती. राष्ट्रीय कार्यकारिणीत उद्धव ठाकरे यांना १६० सदस्यांचा पाठिंबा होता, तर त्यांच्या (शिंदे गटाच्या) बाजूने एकही सदस्य नव्हता. त्यामुळे २०१८ चे संविधान बाजूला सारणे त्यांच्यासाठी अर्थातच सोयीचे होते. पण निवडणूक आयोगाला असे करण्याचा अधिकार कसा होता? असा सवाल यावेळी सिब्बल यांनी उपस्थित केला आहे.

दोन्ही पक्ष स्वतःच आम्ही २०१८ च्या संविधानानुसार आहोत, असे सांगत असताना आयोगाने कोणत्या कायद्याच्या आधारे तो निर्णय घेतला? आयोगाला असा निर्णय देण्याचा अधिकारक्षेत्र नव्हता. आता दिल्ली उच्च न्यायालयाचाही निर्णय आहे की आयोगाकडे असा न्यायनिर्णय अधिकार नाही. आयोगाला जास्तीत जास्त पक्षाची मान्यता काढून घेण्याचा अधिकार आहे. मात्र येथे आयोगाने स्वतःच अधिकारक्षेत्र गृहीत धरले आणि त्याच आधारे प्रकरणाचा निकाल दिला. हे अत्यंत अन्यायकारक आहे. संस्थांवर विश्वास वाटत नसेल, तर अशीच परिस्थिती निर्माण होते, असे यावेळी सिब्बल यांनी म्हटले आहे.






# रेल्वे स्टेशन परिसरात रस्ता चिखलात, नागरिकांचे जीव धोक्यात!

## वाहनचालकांना करावी लागते तरेवरची कसरत, तातडीने उपाययोजनांची मागणी

**छत्रपती संभाजीनगर (दै. लोकनिष्ठ युनूस खान)** – छत्रपती संभाजीनगर शहरात पावसाचा जोर काहीसा कमी झाला असला, तरी अनेक भागांतील रस्त्यांची परिस्थिती अद्यापही खराब आहे.रेल्वे स्टेशन परिसरात पाणी पुरवठा करणाऱ्या पाइप लाइन,गॅस लाईन कामामुळे सुमारे एक ते दीड किलो मीटरचा रस्ता पूर्णपणे चिखलमय झाला आहे. त्यामुळे नागरिकांना दररोज जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत आहे.या चिखलमय रस्त्यावरून शहराचे पालकमंत्री व मंत्री आणि खासदार व आमदार आणि मंत्र्यांचे नेहमी रस्त्यावरुण येणे जाणे होते मात्र या विकास पुरुषांना या चिखलमाय रस्ता व खड्ड्यातील रस्त्यावर लक्ष केंद्रित केले नाही. नुकतेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा शहरात दौरा होता त्यावेळी खड्ड्यात नुसत्या माती टाकून बुजविण्याचे कार्य केले गेले होत्या, रस्त्यामधील खड्ड्यात माती टाकल्याने पावसाळ्यात रेल्वेस्टेशन चौराहा चिखलमय झाला आहे ज्यामुळे वाहनधारकांना डोके दुखी झाले आहे. नेते मंत्री व प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केल्याने हे येथील नागरिकांचे दुर्भाग्य आहे की या विकास पुरुषांचे दुर्भाग्य असे प्रश्न उपस्थित होते.

छत्रपती संभाजीनगर ऐतहासिक शहर (औरंगाबाद) म्हणून ओळखल्याजाणाऱ्या शहराची स्थिती वाईट झाल्याचे स्पष्ट दिसून येते. रेल्वे स्टेशन चौरस्त्यावर पादचारी आणि वाहनचालकांना मोठा त्रास सहन करावे लागत आहे. खोदकामाच्या नंतर रस्त्याची दुरुस्ती करण्याची जवाबदारी कोणाची ? पाईप लाईनच्या कामामुळे या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात चिखल साचला असून पादचाऱ्यांना रस्त्याच्या कडेला अत्यंत सावधपणे चालावे लागत आहे.अनेक ठिकाणी घसरून पडण्याच्या घटना घडत असल्याची माहिती स्थानिकांनी दिली आहे. दुचाकीस्वारांनाही चिखलाचा मोठा फटका बसत असून वाहनांचे संतुलन बिघडल्याने अपघातांचे प्रमाण वाढले आहे. शाळकरी विद्यार्थी आणि नोकरदारांना अडचणी दररोज होत आहे.चिखलमय रस्त्यामुळे वाहनांच्या चाकांमधून उडणाऱ्या चिखलाचा त्रास नागरिकांना सहन करावा लागत आहे. शाळेत जाणारे विद्यार्थी, रोज प्रवास करणारे नोकरदार आणि ज्येष्ठ नागरिकांना या परिस्थितीचा सर्वाधिक फटका बसत आहे. पावसाळ्यात हा प्रश्न अधिक गंभीर झाला असून नागरिकांच्या सुरक्षिततेचा मुद्दा निर्माण झाला आहे.




प्रशासनाकडे तातडीच्या उपाययोजनांची मागणी करण्यात येत आहे.पावसाळा सुरू झाला की प्रशासनाचे दावे आणि कोट्यवधींचे रस्ते आणि दावे वाहून जातात. उघडे आहेत की खड्ड्यात, हे ओळखणेही आता खडखड आहे.स्थानिक रहिवाशांनी संबंधित यंत्रणांकडे अनेकदा तक्रारी करूनही परिस्थितीत सुधारणा झालेली नसल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. रस्त्याची तातडीने दुरुस्ती करावी, साचलेला चिखल हटवावा आणि नागरिकांसाठी सुरक्षित पर्यायी वाहतूक व्यवस्था उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे. या परिसरात रेल्वेस्टेशन चौरस्त्यावरून महापौर बांगला ते पदम पूरा ते बाबापेट्रोल पंप पासून ते रेल्वे स्टेशन चौरस्त्यापर्यंत वाहनाचे होणारे नुकसान आणि नागरिकांचे जीव धोक्यात सापडतात कारण रस्त्याची परिस्थिती अत्यंत धोकादायक झालेली आहे .बाबापेट्रोल पंप उड्डाणपुलावरील हि धोकादायक खड्डे पडलेले आहे. महानगर पालिका व सार्वजनिक बांधकाम प्रशासनाने तात्काळ डोळे उघडून याकडे लक्ष देण्याची गरज असल्याचे युनूस खान यांनी म्हटले आहे.

या भागात व परिसरातील रस्त्यात खड्डे पण तिथे माणसांच्या जीवाशी खेळ सुरू आहे. खड्डा चुकव च्या नादात पट्टीस्वार मोठ्या वाहन खाली चिरडले जात आहेत.आजवर शेकडो नागरिकांनी आपले जीवन लाभलाय. फक्त प्रशासक आणि सरकार उघड्याने हा खेळ पाहत आहे.क्षणार्धात बुज आणि आनंदे यांच्यासाठी हजारो कोटी खडे टाकले जातात. मग हा पैसा बंद? निकृष्ट दर्जाचे काम करणारे नेता आणि पाठीशी घालणारे अधिकारी यांच्या साट्यलोट्या शब्दाची दृश्याची दरावस्था त्यांना कायम स्पष्ट करत आहेत... हा सक्षम काळजी नाही, तर प्रशासकीय खूनपणा आहे! लढाईत खळबळ माजली आहे. निकृष्ट कार्य लढा देणारे जसे मनुष्यवधाचे संबंधित व्यक्ती सदोष आहे, अशी भूमिका अनेकांनी मांडली आहे. मात्र, अशा प्रशासकीय घटनेला पुन्हा घटना घडली आहे की घटना समोर येत आहे. ज्या हा अनुत्तरीत प्रश्न आहे.

छत्रपती संभाजीनगर सह खोल खोलवर खड्डेच आहेत. सर्व आनंदावर खड्ड्यांचे साम्राज्य आहे, लोकांचे नाहक बळी जात आहेत. खड्डेमुक्त करण्याची घोषणा सरकार प्रतीवर्षी करत असते. त्या घोषणांचे परिणाम काय होते? ’समुद्री महामार्गासारखे’ समोरा समोर तयार होतात मग सामान्य लोक त्या राष्ट्राचे का... हाच खरा आहे. प्रशासकाच्या कागदी दाव्यांची पोलखोल या खड्ड्यांनी उघडी पाडली आहे. रोज नवे बळी जात असताना आणि सरकार नेमकी कसली पाहत आहे? अजून किती निष्पाप जिचा बळीचा मोठा संघर्ष, हाच सर्वात मोठा प्रश्न.






9370987123/9860643044
Deccan Darbar
Restaurant & Cafe
Indian I Mughlai I Chinese I Arabic Special
Kausar Baugh, NIBM Kondhwa, Pune - 48. ddarbarpune@gmail.com



हे वृत्तपत्र मालक, मुद्रक, प्रकाशक **युनूस खान** यांनी माइलस्टोन मिडिया, रेल्वेस्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर–४३१००१ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय लोकनिष्ठ, ६१ जीएम प्लाझा, आरटीओ ऑफीसच्या बाजुला, रेल्वेस्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर–४३१००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. संपादक : **युनूस खान**, मो. क्र. **9890190231**, RNI - MAHMAR/2023/87332